॥ श्री ॥

# भक्ततारक श्रीगुरूचरित्र

श्रीगुरूचरित्र गावे ।
श्रीगुरूचरित्र पहावे ।
श्रीगुरूचरित्र ऐकावे।
हाच भक्तीचा गाभा असे ॥१॥

श्रीगुरूचरित्र सुंदर ।
श्रीगुरूचरित्र पादुका मनोहर ।
श्रीगुरूचरित्र भक्ततापहर ।
सिद्ध हे सांगतसे ॥२॥

श्रीगुरूचरित्र वेदरहस्य ।
श्रीगुरूचरित्र देवांचे उपास्य ।
श्रीगुरूचरित्र ब्रह्मभाष्य ।
हे निःसंशय असे ॥३॥

श्रीगुरूचरित्र गाता गाता ।
श्रीगुरूचरित्र ब्रह्मविद्या देई हाता ।
श्रीगुरूकृपा होता ।
श्रीगुरूचरित्र कळतसे ॥४॥

श्रीगुरूचरित्र अत्युत्कट ।
श्रीगुरूचरित्र मिटवी खटपट ।
श्रीगुरूचरित्र विनाअट ।
श्रीगुरूबोध करीतसे ॥५॥

श्रीगुरूचरित्र जीवन ।
श्रीगुरूचरित्र पतित पावन ।
श्रीगुरूचरित्र तनमनधन ।
श्रीगुरूभक्ताचे असे ॥६॥

श्रीगुरूचरित्र छेदी अविद्या ।
श्रीगुरूचरित्र प्रगट करी आत्मविद्या ।
श्रीगुरूचरित्र आहे स्वसंवेद्या ।
सिद्धयोगी हे सांगतसे ॥७॥

श्रीगुरूचरित्र सायंदेव ।
श्रीगुरूचरित्र एकमेव ।
श्रीगुरूचरित्र श्रीगुरूभाव ।
श्रीगुरूकृपे निर्माण करीतसे ॥८॥

श्रीगुरूचरित्र सरस्वती गंगाधर ।
श्रीगुरूचरित्र सुरेख सुंदर ।
श्रीगुरूचरित्र वाची जो नर ।
श्रीगुरूकृपेने तो तरतसे ॥९॥

श्रीगुरूचरित्र श्रीपाद अवतार ।
श्रीगुरूचरित्र तारक ईह पर ।
श्रीगुरूचरित्र खरोखर ।
श्रीनरसिंहसरस्वती असे ॥१०॥

श्रीगुरूचरित्र कालातीत ।
श्रीगुरूचरित्र स्थलातीत ।
श्रीगुरूचरित्र सकलहीत ।
करण्या समर्थ असे ॥११॥

श्रीगुरूचरित्र कथासार ।
श्रीगुरूचरित्र वेदव्यवहार ।
श्रीगुरूचरित्र भवसिंधूपार ।
श्रीगुरूभक्तास करीतसे ॥१२॥

श्रीगुरूचरित्र ब्रह्मबोध ।
श्रीगुरूचरित्र श्रीगुरूशोध ।
श्रीगुरूचरित्र श्रीगुरूवेध ।
श्रीगुरूभावामृत असे ॥१३॥

श्रीगुरूचरित्र सगुण ।
श्रीगुरूचरित्र निर्गुण ।
श्रीगुरूचरित्र माझे 'मी' पण ।
हरोनी टाकतसे ॥१४॥

श्रीगुरूचरित्र ब्रह्मविद्या ।
श्रीगुरूचरित्र तोडी अविद्या ।
श्रीगुरूचरित्रात सर्वच नद्या ।
तीर्थरूप होतात ॥१५॥

---